



# पारनेर दर्शन







वर्ष १ अंक २०१, रविवार २१ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# नीलेश लंके यांनी विखे यांची झोप उडवली!

## ■ शरद पवार यांचे वक्तव्य ■ स्वाभिमान जनसंवाद यात्रेचा समारोप ■ गांधी मैदान गर्दीने फुलले



■ महाविकास आघाडीचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचारार्थ शरद पवार यांची नगर येथे जाहीर सभा पार पडली.

नगर : विशेष प्रतिनिधी

**नीलेश लंके यांना उमेदवारी देऊ नका त्यांच्याऐवजी दुसरा उमेदवार द्या हा महसूलमंत्र्यांचा निरोप घेऊन मुंबईतील उद्योजक तीन आठवडयांपूर्वी माझ्याकडे आला होता असा गौप्यस्फोट करीत नीलेश लंके यांचे नाव पुढे आल्याने विखे यांचे झोप उडाली असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले.**

महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी मतदारसंघात काढलेल्या स्वाभिमान जनसंवाद यात्रेचा समारोप नगर येथील गांधी मैदानावरील सभेने झाला. यावेळी शरद पवार यांनी उपस्थितांशी संवाद साधला. सभेसाठी मोठा जनसमुदाय आल्याने गांधी मैदान गर्दीने फुलून गेले होते.

पवार म्हणाले, मी जाहिरपणाने सांगतो, जबाबदारीने सांगतो की मुंबईच्या एका उद्योगपतीला विखे यांनी तीन आठवडयापूर्वी माझ्याकडे पाठविले. ते म्हणाले, महसूलमंत्र्यांची विनंती आहे की काही करून पवार साहेबांकडे जा आणि त्यांना सांगा की नीलेश लंके सोडून दुसरा कोणीही उमेदवार द्या. नीलेश लंकेचं नाव आलं आणि त्यांची झोप उडाली. यापूर्वी माझ्या जागांसबंधी त्यांनी कधीही पाऊल टाकलं नाही. आज मात्र एका मोठया माणसाला माझ्याकडे पाठविले. याचा अर्थ तुमच्याकडे सत्ता असेल, साधनं असतील आणि इथं माणूसकी आणि सामान्य माणसांचं प्रेम हा खजिना ज्यांच्याकडे आहे त्या नीलेश लंके विचार करणे त्यांना शक्य नव्हते असे पवार म्हणाले.

पवार पुढे म्हणाले, ही निवडणूक महत्वाची आहे. शेती, पाणी, रोजगार, उपेक्षित समाज महिलांवर होणाऱ्या अत्याचार आदी प्रश्न आहेत. हे सगळं बदलायचे असेल तर एक भक्कम खासदार तिथे असला पाहिजे. आज ज्यांच्या हाती सरकार आहे, त्यांना लोकांच्या प्रश्नासबंधी यत्कींचितही अस्था नाही. यांच्या हाती पुन्हा सत्ता गेल्यावर लोकशाही आणि संविधान हे शिल्लक राहणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अतिशय कष्टाने आपल्याला घटना दिली. त्यामुळे हा देश एकसंघ राहिला. भारताच्या आजूबाजूच्या देशांमध्ये अशी घटना नव्हती. त्यामुळे अनेक संकटांना त्या देशांना तोंड द्यावे लागले. पाकीस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या देशांमध्ये हुकूमशाही होती.

भारतामध्ये मात्र हुकूमशाही नव्हती. आज घटनेसबंधी चुकीचा विचार राज्यकर्त्यांच्या मनामध्ये येतो की काय अशी शंका आमच्या मनात आहे. बंगलोर येथील एका भाजपा नेत्याचं विधान माझ्या वाचनात आलं. ते हेगडे हे केंद्र सरकारमध्ये मंत्री होते. या देशाची घटना दुरूस्त करून बदलण्यासाठी मोदींना अधिकार हवाय त्यासाठी त्यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले. या लोकांचा सामान्य माणसाच्या अधिकारावर यत्कींचीतही विश्वास नाही. सत्ता हाती घेऊन सत्तेचा गैरवापर करून तुम्हा सर्वांना ते संकटात टाकतील. त्यासाठी लंके यांना विजयी करावे लागेल असे पवार म्हणाले.

यावेळी आ. आदित्य ठाकरे, आ. रोहित पवार,भुषणसिंह होळकर, आ. रोहिदास पवार, दादाभाऊ कळमकर, विक्रम राठोड, आ. सुनील शिंदे, राहुल जगताप, अंकुश काकडे, घनश्याम शेलार, बाबासाहेब भोस यांच्यासह मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

### चुकीच्या कामाला आश्रय नाही

पतसंस्थेला राजकीय आश्रय दिल्याचा माझ्यावर आरोप केला. मी ज्यांना आश्रय दिला ते आता तुरूंगात जाऊन बसलेत. चुकीच्या कामाला आम्ही कधी आश्रय दिलेला नाही. यांनी मात्र स्वतः चिफ प्रमोटर असलेल्या प्रवरा पतसंस्थेने नगरची रावसाहेब पटवर्धन पतसंस्था चालवायला घेतली. काय घोटाळे घातले माहीत नाही. पण दोन तीन महिन्यांपूर्वी एक मोर्चा आला होता. ठेवीदारांच्या ठेवी द्या, महसूलमंत्र्यांनी महसूलमंत्रीपद सोडावं आणि ठेवी परत कराव्यात अशी मागणी करण्यात येत होती असा आरोप बाळासाहेब थोरात यांनी केला.

### त्यांना माणूसकी नाही

टीका करणारांवर मी जास्त बोलणार नाही. ते माझ्यावरही टीका करतात. बाळासाहेब थोरात त्यांचा आवडता विषय. त्यांच्यावर ते जास्त टीका करतात. या लोकांना हे आठवत नाही, त्यांच्या सार्वजनिक जीवनामध्ये बाळासाहेब किंवा माझ्याकडून त्यांना काही ना काही मदत झालेली आहे. बाळासाहेब विखे यांना निवडणूक लढवायची होती. मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, त्यांची निवडणूक सोपी नव्हती. त्यांना यश संपादन करायचे असेल तर बाळासाहेब विखे यांना भाऊसाहेब थोरात यांची मदत हवी होती. परंतू त्यांना मदत मिळेल याची खात्री त्यांना नव्हती. विखे यांनी माझ्यापुढे हा प्रश्न मांडला. मी जिल्हयाच्या दौऱ्यावर होतो. रात्री एक वाजेपर्यंत माझ्या बैठका सुरू होत्या. आम्ही जोर्वे येथे जाण्याचा निर्णय घेतला. काही चुक भूल असेल तक्रार असेल तर माफी मागू असे ठरविण्यात आले. रात्री तीन वाजता मी बाळासाहेबांना जोर्वे येथे घेउन गेलो.भाऊसाहेबांना झोपेतून उठवून त्यांच्याशी विचार विनिमय केला. झालं, गेलं विसरून जाण्याची विनंती केली. त्यांनी मोठया अंतःकरणाने सगळया गोष्टी माफ केल्या. आणि मोठया मताधिक्क्याने विजयी करण्याचा शब्द दिला. आणि बाळासाहेब विखे यांनी तो विजय संपादन करून दाखविला. जिल्हा परिषद, सहकारी संस्थांमध्ये विखे होते. मात्र लोकसभेत जाण्याचा रस्ता ज्यांनी खुला केला, त्यांच्या कुटूंबियांवर टीका टीपन्नी करणे याचा अर्थ काय ? याचा अर्थ एकच आहे माणूसकी नसल्याचे पवार यांनी सांगितले.

### या गडयानं कसं प्रेम निर्माण केलं ?

नीलेश लंके उमेदवार म्हणून घोषीत होण्यापूर्वीच वातावरण तयार होते. आमदार पारनेरचा परंतू वातावरण सगळीकडेच कसे तयार होते हे समजायला तयार नाही मला. मी राज्यातला ज्येष्ठ आमदार आहे. मला काही गौडबंगाल कळालं नाही या गडयानं सर्व मतदारसंघात आपलं प्रेम कसं निर्माण केलं ? साध सुत्र आहे, शेतकरी कुटूंबातला आहे. तुमच्या आमच्या कुटूंबातला आहे. मनापासून तुमच्याकरता काम करणारा आहे. धडपडणारा आहे. जीवाचं रान करणारा आहे. जीवला जीव देणारा आहे. कोरोना काळात पेशंटसोबत बसून त्याला गोंजारून त्याची विचारपूस करणे हे नीलेश लंकेच करू जाणो हे दुसऱ्या कोणाला जमणार नाही. हे प्रेम दिसते ते खोटं नाही, त्यांनी ते सिध्द केले आहे.

आ. बाळासाहेब थोरात
काँग्रेस नेते

### लंके यांचे दिल्लीसाठी बुकिंग करून आलोय

लंके यांच्यासाठी आज खास इथे आलो असून त्यांचे दिल्लीसाठी बुकिंग करून आलेलो आहे. त्यांनी आयोजित केलेल्या सभेचे शेवटचे टोकच कुठे आहे ते दिसत नाही. ते टोक दिल्लीपर्यंत पोहचले असून तुम्ही तिथे गेल्यावरही ते टोक दिसणार असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले.

### लंके दाम्पत्याने हिरा दिला !

नीलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके इथे सभेमध्ये खाली बसल्या आहेत. त्यांच्या लग्नाचा आज वाढदिवस आहे. त्यासाठी मी इथे फुले आणून ठेवली होती. त्यांनी मात्र ती दुसऱ्याला देऊन टाकली. त्यांचा स्वभाव असाच आहे, स्वतःसाठी काही ठेवायचंच नाही. सर्वांच्या वतीने दोघांचे अंतःकरणापासून अभिनंदन करतो. राणी लंके यांचेही अभिनंदन करतो कारण असा नवरा त्यांनी सांभाळला. ते अखंड लोकांमध्ये असतात. घरात राहत नाहीत. लोकांची सेवा ते करतात हे काम ते अखंडपणे करतात. असा हिरा त्यांच्या आईवडीलांनी नगर जिल्हयाला नव्हे तर महाराष्ट्राला दिल्याचे गौरवोद्गार शरद पवार यांनी काढले.

### पार्लमेंटमध्ये मराठीत बोलण्याचा अधिकार

माझ्या वाचनात आले की त्यांच्याबद्दल एक प्रश्न उपस्थित केला गेला. पार्लमेंटमध्ये ते कोणत्या भाषेत बोलणार ? हा प्रश्न ज्यांनी उपस्थित केला ते पार्लमेंटचे सभासद होते. त्यांना हे समजायला पाहिजे होते की पार्लमेंटमध्ये कोणत्याही भाषेत बोलायचा अधिकार आहे. पार्लमेंटमध्ये मी कधी इंग्रजीत, हिंदीत आणि शुध्द मराठीतही बोललो. मराठीत बोलण्याचा अधिकार त्या ठिकाणी आहे. तुमच्या भाषणाचे हिंदी आणि इंग्रजीमध्ये तिथे भाषांतर होते. त्यामुळे नीलेश लंके आपल्या लोकांचे प्रश्न तिथे मांडतील असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.

### शरद पवारांचा रेटून खोटे बोलण्याचा धंदा !

खोटे बोल पण रेटून बोल हाच शरद पवार यांचा धंदा आहे. त्यांना त्यांच्या सोईनुसार राजकारण करण्याची सवय आहे.शरद पवारांनी विखे यांच्यावर एका उद्योजकामार्फत नीलेश लंके यांना उमेदवारी न देण्याचा निरोप पाठवल्याचा आरोप केला होता. त्यांच्या आरोपाचा राधाकृष्ण विखे यांनी शनिवारी चांगलाच समाचार घेतला.मी त्यांच्या विधानांना फारसे महत्त्व देत नाही. कारण, खोटे बोल पण रेटून बोल हाच त्यांचा धंदा आहे, असे ते म्हणाले.

### त्यांना नीलेश लंके यांची भिती वाटतेय

या लोकांबद्दल काय सांगायचे ? किती पक्ष बदलले ? शिवसेनेत होते. शिवसेना सोडली, काँग्रेसमध्ये आले, विरोधीपक्ष नेता झाले, ते पद उपभोगले, ते सोडून दिले. भाजपामध्ये गेले आणि मंत्री म्हणून त्या ठिकाणी बसले आणि आज टीका टीपन्नी करतात. या लोकांना आत्मविश्वास नाही. निवडणूकीला उभे राहिले आणि त्यांना नीलेश सारख्याची चिंता, भिती वाटते असे शरद पवार यांनी सांगितले.

### कामाच्या माध्यमातून माझी ओळख

ज्यांना पाच वर्षापूर्वी आपण निवडून दिले त्यांनी मोठ मोठया गप्पा मारल्या, घोषणा केल्या, विकासाचे काम मात्र केले नाही. त्यांनी विकासाच्या मुद्यावर सामोरे जाणे अपेक्षीत होते. मात्र विकासाचा मुद्दा न घेता ते वैयक्तीक टिका टिपन्नी केली जाते. मला इंग्रजी बोलता येते का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. इंग्रजी बोलणारा हवा की काम करणारा हवा ? रिझल्ट देणेवाला चाहिये. २४,२४ तास काम करणारा मी माणूस आहे. माझी ओळखच कामाच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. माझ्या मतदारसंघात जाऊन पहा काय विकास केला आहे ते.

नीलेश लंके, उमेदवार

### कनोली, मनोली, कणकापुर, दाढ, चणेगांव, हसनापुर !

मी राज्यात फिरतोय, चार चार जिल्हयात सभा घेतोय. आपले पालकमंत्री स्वतःला ज्येष्ठ मंत्री समजतात. त्यांना आम्ही गमतीने म्हणतो कनोली, मनोली कणकापुर, दाढ चणेगांव, हसनापूर झाला त्यांचा दौरा ! विरोधी पक्ष नेते असतानाही त्यांचा दौरा असाच असायचा. आता तर तुम्ही पक्कं गुंतवून ठेवलंय. आपल्या कर्तुत्ववान सुपुत्राने काय कर्तुत्व गाजवलं हे निवडणूकीच्या प्रचारामध्ये सांगायला पाहिजे होते तर ते शरद पवार यांच्यावर टिका करत आहेत. माझ्यावरही आरोप केल्याचे बाळासाहेब थोरात म्हणाले.

### २४ तास ३६५ दिवस सेवेसाठी असेल

कॉलेज जीवनात अनिल भैय्या राठोड यांच्या प्रत्येक सभेला मी हजर असायचो. भैय्यांची सुरूवात याच गांधी मैदानाच्या सभेने व्हायची आणि निवडणूकीत परिवर्तन व्हायचे. त्याच भैय्यांचा वारसा घेऊन त्यांच्या पावलावर पाऊल ठेऊन आम्ही नगर जिल्हयात काम करतो. आज भैय्यांची आठवण येते. ते असते तर मला नगर शहरावर लक्ष देण्याचीही वेळ आली नसती. भैय्यांचा नारा होता भयमुक्त नगर शहर. काहींनी नारा दिला होता भयमुक्त नगर शहर. काय केले त्यांनी ? ज्या ठिकाणी नगरवासीयांना, व्यापाऱ्यांना त्रास झाला तर हा नीलेश लंके २४ तास ३६५ दिवस तुमच्या सेवेला असेल अशी ग्वाही उमेदवार नीलेश लंके यांनी दिली.

### व्यापारी, उद्योजकांचे प्रश्नांसाठी मी पुढाकार घेईल

आज मला व्यापारी भेटले. व्यापाऱ्यांमध्ये दहशत असल्याचे सांगितले गेले. नगर शहरातील व्यापाऱ्यांना दहशतीमुळे चिंता वाटावी हे योग्य आहे का. उद्योजकही भेटले. ज्यांच्या हाती सत्ता आहे. त्यांनी नगरच्या एमआयडीसीमध्ये काही नवीन कारखाने यावेत , एमआयडीसीचे प्रश्न सोडविण्याकडे त्यांचे लक्ष नाही. मी नीलेश लंके यांना एवढेच सांगतो. तुम्ही या मतदारसंघाचे प्रश्न सोडवा. मात्र एमआयडीसी आणि व्यापाऱ्यांचे हे दोन प्रश्न पाहिले सोडवा. हवे असेल तर मी बाळासाहेब थोरात यांना कधीही बोलवा हे प्रश्न कसे सुटत नाहीत हे आम्ही बघतो. मी स्वतः जबाबदारी घेतो.

शरद पवार
अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

### लंके यांची जबाबदारी पेलण्याची तयारी

बऱ्याच दिवसांतून मी आज गांधी मैदानावर बोलतो आहे. एक काळ असा होता नगरला माझी सभा असेल तर ती गांधी मैदानावरच होत असे. या मैदानाला इतिहास आहे. अनेक प्रश्नांसाठी आम्ही लोकांनी या ठिकाणी सभा घेतल्या. नीलेश लंके यांनी यात्रा काढून ते गावोगाव गेले, लोकांना भेटले त्यांची सुख,दुःख जाणून घेतली. उद्या आपल्या खांद्यावर जी जबाबदारी पडणार आहे. ती पेलण्याची तयारी त्यांनी केली आहे. जे काम ज्यांच्यासाठी हाती घेतले आहे त्यांच्याशी त्यांनी सुसंवाद साधला त्याबद्दल मी लंके यांचे अभिनंदन करतो, त्यांना धन्यवाद देतो असे शरद पवार म्हणाले.

### लंके मोठया मताधिक्क्याने विजयी होतील

ग्रामीण भागातील मुले तीन, चार किलोमिटर पायी चालून शाळेत जात असल्याने नीलेश लंके यांनी आठ हजार सायकलचे मोफत वितरण केले ही लहान गोष्ट आहे का ? अशी अनेक कामे त्यांनी आपल्या आयुष्यामध्ये केली. लोकांसाठी आपले जीवन आहे हा निर्णय लंके पती, पत्नीचा आहे. लोकसभेसाठी नीलेश लंके हे निवडणूक लढवित आहे. माझी खात्री आहे मोठया मताधिक्क्याने ते विजयी होतील असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.

### सगळे फोडले तरीही भाजपाला सिट मिळणार नाही

अडीच वर्षापूर्वी महाराष्ट्रात गद्दारी झाली. शिवसेना पक्ष फोडला गेला. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. परिवार फोडला. काँग्रेसमधून आमदार फोडण्याचा प्रयत्न केले. सकळं चोरून शिवसेनेचे धनुष्यबाण, राष्ट्रवादीचे घडयाळ चोरले. आता ठाकरेही चोरायला लागले आहेत. पण भाजपाला सिट मिळणार नाहीत हे जनतेने ठरविले आहे.

आदित्य ठाकरे
शिवसेना नेते

### साऊथ मे साफ, नॉर्थ मे हाफ !

संपूर्ण महाराष्ट्रात जे चित्र दिसते आहे ते देशभर दिसत आहे. चारसो पार आपल्या कानावर सतत येत असते. चारसो पार नव्हे तर तिथे तडीपार लागलेले आहे. अबकी बार भाजपा तडीपार हे लोकांच्या तोंडून ऐकू येत आहे. साउथ मे साफ आणि नॉर्थ मे हाफ अशी भाजपाची अवस्था झाली आहे. देशातील स्थिती पाहिली तर भाजपा दोनशे तरी पार करणार आहे का ? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला.




# युवा

## रुसवा-फुगवा काढायला निघालात?

**गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड असो की, नवरा बायको छोट्या मोठ्या गोष्टींवरून बऱ्याचदा जोडप्यांमध्ये खटके उडतात. नातं म्हटलं की, या गोष्टी आल्याच. पण छोट्या- मोठ्या भांडणानंतर पुन्हा पहिल्या सारखं खेळीमेळी राहणं अन् नातं फुलणं ही गोष्टही जमली पाहिजे.**



- असुरक्षितता कशी कमी कराल? : काही मंडळींना पार्टनरचा रुसवा-फुगवा काढायला फार वेळ लागत नाही. या प्रकारात मोडणारं नातं काही औरच. याउलट काहीजण पार्टनरला मनवण्याच्या नादात असं काही करतात की, भांडण मिटण्याऐवजी ते अधिक भडकते. ज्यामुळे वाद टोकाला जाऊन नात्यात दूरावा निर्माण होण्याचा धोका निर्माण होतो. सांगण्याचा मुद्दा हा की, पार्टनरसोबत वाद झाल्यानंतर तिची अथवा त्याची समजूत काढत असताना काय बोलावे, यापेक्षा कोणत्या गोष्टी बोलू नयेत, ते आधी समजून घ्या. नाहीतर वांदेच होतील.
- वाद कशावरून झाला त्या कारणावर जोर देऊ नका : कपलमधील वादानंतर ठराविक काळ शांतता निश्चित पसरेल. पण ही गोष्ट काही कायमची नसते. थोडा वेळ निघून गेल्यावर भांडणाचा मुद्दा बाजूला पडतो. पण जर तुम्ही वादाचं कारण डोक्यात ठेवून बसला तर मात्र नात्यातील हा वाद एक वेगळं वळण घेईल. रुसवा फुगवा काढताना भांडणाचं कारण काय होतं, यावर चर्चा करून नका. यामुळे पार्टनर अधिक नाराज होईल.
- भांडण विसरुन एकत्र येण्याचा दिखावाही नाही काही कामाचा : बऱ्याचदा भांडण झाल्यावर ते मिटवण्याचा दिखावाही केला जातो. नातं जपायचं तर ते मनापासून जपावं, हा दिखावा जर पार्टरनच्या लक्षात आला तर नात्यातील वादा गुंता आणखी घट्ट होंल. जरी चूक समोरच्याची असेल तरी तुम्हाला मोठे मन दाखवून त्याला माफ करण्याची तयारी दाखवावी लागेल. ही गोष्ट वाद मिटवून नातं अधिक घट्ट करण्यास उपयुक्त ठरेल.
- वाद घातला अन् लगेच मिटवायला गेला हा तोराही नाही बरा : वाद घालायचा आणि मग तो मिटवायसाठी लगेच धावपळ करायची, ही गोष्ट निर्थक ठरते. जर एखाद्या गंभीर विषयावरून वाद झाला असेल तर तुमच्या पार्टनरला शांत होऊ द्या. पार्टनरची समजून काढण्यासाठी गडबड करू नका. आधी त्याच्या मनस्थितीचा वेध घ्या. चर्चेतून कोणत्याही गोष्टीचा मार्ग निघतो. पण चर्चा सकारात्मक होण्यासाठी तुमचा पार्टनर त्यात मनापासून सहभागी असायला हवा. ही गोष्ट तेव्हाच शक्य होईल ज्यावेळी तुम्ही त्याला वेळ द्याल.



## 'या' ७ खास गोष्टी मुलांना मुलीत हव्या असतात

**आजकाल नाती बनवणं खूप सोपं झालंय पण असं असलं तरी लोकं नातं जोडायला घाबरतात. इतकंच नाही तर बहुतेक लोकांचा असाही विश्वास आहे की चुकीच्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवण्यापेक्षा एकटं आयुष्य जगणं जास्त चांगलं आहे. मुलींना कोणत्या प्रकारची मुलं हवीत याबद्दल आपण अनेकदा बोलत असलो तरी आज आपण पुरुषांच्या आवडीनिवडींबद्दल बोलणार आहोत. स्त्रियांप्रमाणेच पुरुषांच्या आवडीनिवडीही महत्त्वाच्या असतात. शेवटी, तो देखील आपल्या जोडीदाराचा आणि ती कशी असावी याबद्दल विचार करत असेल. त्याला संपूर्ण आयुष्य कोणत्या मुलीसोबत घालवायचे आहे? तथापि, मुलींचा असा विश्वास आहे की मुलांची पसंती जाणून घेणे खूप कठीण आहे. तर येथे काही मुद्दे आहेत जे पुरुषाला त्याच्या मैत्रिणीमध्ये हवे असतात...**

- त्रास न देणे : बहुतेक मुली त्यांच्या बॉयफ्रेंडवरही चिडचिड करतात. ती विनाकारण भांडणासाठी कारणं शोधत राहते. जे मुलांना अजिबात आवडत नाहीत.




त्याला असे वाटते की जेव्हाही तो त्याच्या मैत्रिणीला भेटतो तेव्हा त्यांनी चांगला वेळ घालवला पाहिजे आणि एकमेकांशी भांडू नये. जर एखादी गोष्ट तुम्हाला खूप त्रास देत असेल तर ती योग्य मार्गाने समोर आणा.
- स्वावलंबी : रिलेशनशिपमध्ये आल्यानंतर अनेक महिला आपल्या पार्टनरवर अवलंबून असतात. जरी ते आर्थिक असेल. तिला तिच्या पालकांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी जोडीदार मिळू लागतो. मुलं एका मर्यादेपर्यंत जबाबदाऱ्या पार पाडण्यात स्वारस्य दाखवतात. परंतु, त्यांच्या मैत्रिणीने शक्य तितके स्वतःचे काम करावे, अशी त्यांची अपेक्षा असते. बरं, हे मुलींसाठी देखील चांगले आहे कारण ते त्यांना स्वावलंबी बनवते.
- शहाणे व्हा : एखाद्या मुक्या मुलीला प्रभावित करण्यासाठी कदाचित कमी प्रयत्न करावे लागतील. परंतु, दीर्घकाळापर्यंत, प्रत्येक पुरुषाला त्याच्या मैत्रिणीशी खोल नातेसंबंध अनुभवण्याची इच्छा असते. मुलांना नेहमी त्यांच्या मैत्रिणी हुशार असाव्यात. जेणेकरून ते तिच्याशी प्रत्येक विषयावर सहज चर्चा करू शकतील.
- लैंगिक सुसंगतता : प्रेमाप्रमाणेच कोणत्याही नात्यात लैंगिक अनुकूलताही खूप महत्त्वाची असते. तिला लैंगिकदृष्ट्या सक्रिय आणि उत्साही असणे आवश्यक आहे. कंटाळवाण्या लैंगिक जीवनामुळे निराशाजनक नातेसंबंध निर्माण होतात. अशा परिस्थितीत, मुलांसाठी एक स्त्री असणे चांगले आहे जिला तिच्या लैंगिकतेबद्दल माहिती आहे आणि तिचा अभिमान आहे.
- दोघांमध्ये मैत्रीपूर्ण राहा : तुम्हाला माहिती आहे, सगळ्याच मुली अशा नसतात. भागीदारांमधील मैत्री संपली की बहुतेक संबंध बिघडतात. स्वभावाने मैत्रीपूर्ण मुलगी केवळ तुमचे जीवन खूप सोपे करत नाही तर तुमच्या जिवलग मित्रांसोबत सहज मैत्रीही करते. कल्पना करा की तुमच्या मैत्रिणीने तुमच्या मित्रांवर तुमच्याइतकेच प्रेम केले तर किती छान होईल.
- नेहमीच साथ देणारी : प्रत्येक पुरुषाला एक मैत्रीण हवी असते जी त्याला एक चांगला माणूस बनवते. पुढे जाण्यास मदत करणारी मुलगी शोधणे म्हणजे सोन्याला पॉलिश करण्यासारखे आहे.
- थोडी स्पेस द्या : अनेकदा आपण पाहतो की बहुतेक महिलांना त्यांच्या जोडीदाराला स्वतःशी बांधून ठेवायला आवडते. ती तिच्या जोडीदाराला त्याच्या मित्रांनाही भेटण्यापासून रोखते. एक आदर्श मुलगी समजते की स्पेस दिल्याने नाते टिकते. त्यामुळे दोघांमध्ये चांगला समन्वयही निर्माण होतो.

## तुमच्या ५ गोष्टींवर तिची करड नजर

**महिलांना कोणत्या प्रकारचे पुरुष अधिक आवडतात किंवा आकर्षित करतात? ही गोष्ट समजून घेतली तर तिला इम्प्रेस करणं सहज शक्य होईल. बहुतांश पुरुष तिला इम्प्रेस करण्यासाठी बऱ्याच गोष्टी ट्राय करतात. पण जर बेसिक गोष्टीच तुम्ही तिच्या विरोधात केल्या तर तुमचं गणित जुळणार नाही. पुरुष कधी कधी गोड बोलून तर कधी डॅशिंग लूक देऊन महिलांचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतात. पण नुसता अंदाज लावण्याऐवजी एखादी महिला कोणत्या ५ गोष्टी पुरुषांमध्ये पहिल्यांदा नोटीस करते, ते जाणून घ्या. तिच्या मनात घर करायचं असेल तर ती कोणत्या गोष्टींमुळे आकर्षित होऊ शकते हे नीट समजून घेतले तर निश्चितच तुम्ही तिच्यासोबत नाते गुंफण्याच्या दिशेने योग्य पाऊल टाकाल...**

- तुमचा लूक मॅटर करतो : पहिल्या नजरेत एखाद्या व्यक्तीला जज करताना त्याचा पोशाख महत्त्वाचा भाग असतो महिला देखील एखाद्या पुरुषाकडे बघताना पहिल्या नजरेत त्याचा लूक कसा आहे, ते बघतात. जर काहीही घालून तिला भेटण्याचा प्लान आखला तर तो फसणारा ठरू शकतो. तुमच्या स्किन टोन आणि व्यक्तिमत्त्वानुसार तुम्हाला सूट होईल असे कपडे घाला. लूक नेहमी आकर्षक ठेवण्याला पसंती द्या.
- स्माईल : हसरा चेहरा कुणाला आवडणार नाही. जेव्हा तुम्ही तिच्या समोर हसत जाल तेव्हा ती तुम्हाला एका वेगळ्या नजरेतून पाहील. तिच्या दृष्टीने तुम्ही इतरांपेक्षा वेगळे ठराल. तुम्ही आयुष्याचा किती आनंद घेत आहात. ही गोष्ट तिच्या मनाला नक्कीच स्पर्श करून जाणारी असेल. पण इतके हसू नका की, ते स्मित त्यांना खोटे वाटावे.
- हेयर स्टाइल : जर तुम्हाला क्रशला प्रभावित करायचे असेल किंवा तिने तुम्हाला बघावे अन् बघत रहावे, हा सीन अनुभवायचा असेल तर तुमची हेअरस्टाईल परिपूर्ण असावी. तुम्ही तुमच्या केसस्टाइलकडे लक्ष द्या. जर तुम्ही याकडे दुर्लक्ष केले तर ती तुमच्याकडे दुर्लक्ष करू शकते. ट्रेंड फॉलो करण्यापेक्षा तुमच्या चेहऱ्या पट्टीला कोणती हेअर स्टाईल अधिक परफेक्ट वाटते त्या हेअर स्टाईलला पसंती द्या.
- स्वच्छता सर्वात महत्त्वाची : स्वतःची स्वच्छता ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. कपडे, शूज, केस, नखे आणि शेव्हिंगच्या स्वच्छतेची काळजी घ्यावी लागेल. बऱ्याचदा तुमच्या वाढलेल्या आणि अस्वच्छ नखावरून तुम्ही



स्वतःची काळजी घेता किंवा नाही ती गोष्ट पटकन समजून येते.
- महिलांचा आदर करा : तुम्ही सर्व गोष्टीत परफेक्ट आहात पण महिलांविषयी तुमच्या मनात आदर नसेल, तर कोणतीही ती तुम्हाला कधीच भाव देणार नाही. पुरुषाचे महिलांसोबतचे वागणे कसे आहे? ही गोष्टी तिच्या मनात तुमची छबी निर्माण करण्यासाठी अति महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे महिलांना आदर देत असाल तर तुम्ही या टेस्टमध्ये पास व्हाल.



## उन्हाळयात पोलो टी-शर्टला पसंती देताय?



**पोलो टी-शर्ट हा पुरुषांसाठी असा पोशाख आहे जो स्मार्ट कॅज्युल असला तरीही फॉर्मल अनुभवही देतो. जेव्हा तुम्ही हा कॉलर असलेला टी-शर्ट घालता तेव्हा पुरुषांचा लूक पूर्णपणे बदलतो. तुमच्या वॉर्डरोबमध्ये भरपूर पोलो टी-शर्ट्स असले पाहिजेत. पण ते घातल्यानंतर तुमच्या लूकचं कोणी कौतुक केल आहे का? अनेकांना कॉम्प्लिमेंट्स मिळाले असेल, पण कदाचित तुम्हाला नाही. तसे असल्यास, समजून घ्या की, पोलो टी-शर्टशी संबंधित महत्त्वाच्या गोष्टींकडे तुम्ही कदाचित दुर्लक्ष केले आहे. फॅशनचे काही नियम असतात, त्याच्याशिवाय कपडे कितीही महाग असले तरी परफेक्ट लूक कधीच मिळू शकत नाही. वास्तविक, पोलो टी-शर्ट घालताना पुरुषांकडून अनेक चुका होतात. या छोट्या छोट्या चुका सुधारणे आवश्यक आहे. जेणेकरून तुम्हीही तुमच्या कलेक्शनमधील पोलो टी-शर्टमध्ये स्मार्ट दिसाल...**

### कोणते फॅब्रिक सर्वोत्तम...

पोलो टी-शर्टचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रत्येक आकार आणि आकाराच्या शरीराला शोभते. पण ज्या फॅब्रिकपासून ते तयार केले जाते त्याची काळजी घेणे आवश्यक आहे. वास्तविक पिक कॉटनपासून तयार केलेला टी-शर्ट सर्वोत्तम असतो. सुती धाग्यावर खास विणलेला हा टी-शर्ट तुम्ही उंच आणि जड शरीराचे मालक असाल तेव्हा उत्तम लूक देतो. टेक्सचर्ड फॅब्रिकमुळे या फॅब्रिकचा टी-शर्ट शरीरावर बसतो आणि छातीसह खांद्याचा लूकही चांगला येतो. पण बॉडी लूकचा जास्त विचार न केल्यास कॉटन आणि कॉटनच्या मिश्रणाचा टी-शर्टच घालावा. ते पिकअपपेक्षा अधिक आरामदायक आहेत.

### प्रथमच साधा टी-शर्ट...

तुम्ही पहिल्यांदाच पोलो टी-शर्ट घालणार असाल किंवा लूकमध्ये जास्त प्रयोग करणे टाळत असाल, तर प्लेन टी-शर्ट निवडा. यामुळे लूक अचानक बदलणार नाही आणि तुम्ही त्याच्याशी जुळवूनही घेऊ शकाल. मग काही काळानंतर, स्ट्रिप्स आणि इतर पॅटर्नदेखील ट्राय करून पाहा. जर तुम्ही पहिल्यांदा पोलो टी-शर्ट घालणार असाल, तर काळा, नेव्ही, राखाडी आणि पांढरा. या रंगांचे वैशिष्ट्य म्हणजे ते प्रत्येक त्वचेच्या रंगाशी आणि शरीराच्या प्रकाराशी जुळतात. जेव्हा तुम्ही त्यांना तुमच्या लूकमध्ये चांगल्या प्रकारे समाविष्ट करता, तेव्हा रंगांच्या वेगवेगळ्या छटा निवडा. फक्त लक्षात ठेवा की तुम्ही कोणताही रंग निवडाल, तो तुमच्या केसांचा रंग आणि त्वचेच्या टोनला पूरक असावा. जसे की प्रत्येकजण पिवळ्या आणि फ्यूशिया गुलाबी रंगाने चांगले दिसू शकत नाही.

**लोगोबद्दल...** जेव्हा जेव्हा पोलो टी-शर्टवर लोगो निवडण्याची वेळ येते तेव्हा नेहमी लहान लोगो निवडा किंवा तुम्ही पातळ लोगो देखील निवडू शकता. लोगो नसलेला टी-शर्ट घेतल्यास बरे होईल.

### काय करावे आणि काय टाळावे?

- जर तुम्ही पोलो टी-शर्ट निवडत असाल तर काही गोष्टी लक्षात ठेवा, जसे की टी-शर्ट फिट होईल याची काळजी घ्या, खूप सैल किंवा घट्ट टी-शर्ट घालू नका. जर तुमचे शरीर गुबगुबीत असेल, तर कापसासारख्या हलक्या वस्तूंनी तयार करण्यात आलेला टी-शर्टच खरेदी करा. अशी सामग्री शरीराला खूप अवजड न ठेवता ते सहजपणे कव्हर करते.
- स्टँड कॉलर : पोलो टी-शर्टची कॉलर उभी करून स्टायलिश दिसण्याची चूक कधीही करू नका. ते अजिबात चांगले दिसत नाही. तुमचे वय किशोरवयीन असेल तरच हे करा.



- पॉकेट बद्दल : खिशाचा टी-शर्ट शक्यतो वापरू नका. कारण खिसे असलेले टी-शर्ट थोडेसे विचित्र दिसू लागतात. याशिवाय टी-शर्टच्या खिशाचाही फारसा उपयोग नसतो.
- पोलो टी शर्टची लांबी : पोलो टी-शर्ट खरेदी करताना, तुम्ही अनेकदा त्याच्या लूककडे लक्ष द्याल, परंतु आतापासून त्याच्या लांबीकडे देखील लक्ष द्या. ते कधीही पाठीमागे लांब नसावे. तसेच ते तुमच्या जीन्सच्या खिशात राहायला हवे. जर ते यापेक्षा लहान असेल, तर तुम्ही हात वर करता तेव्हा ते तुम्हाला क्रॉप टॉपसारखे फील देईल.

## मैत्री तुटणं ब्रेकअपसारखंच!

**मैत्रीचं नातं हे अनमोल असतं, ही गोष्ट तुम्ही बऱ्याचदा ऐकली असेल. प्रत्येकाच्या आयुष्यात किमान एक तरी असा मित्र असावा की, जो अगदी जीवाभावाचा वाटेल. यामागचं कारण अस की, अशा व्यक्तीसोबत आपण मनमोकळेपणाने बोलू शकतो. मन हलकं करण्यासाठी मैत्रीच्या नात्यासारखं दुसरं कोणतही नातं असू शकत नाही, ही गोष्टही अनेकांना पटेल...**

### मैत्री टिकवायची कशी?

दोस्तीत कुस्ती हा सीन ब्रेकअपसारख्या वेदना देणारा पण बऱ्याचदा या ना त्या कारणामुळे मैत्रीतही वाद होतात. काही वेळा गोष्टी इतक्या टोकाला जाते की, दोस्तीत कुस्ती हा सीन पाहायला मिळतो. दोस्ती तुटायची नाय म्हणणारे दोन जीवलग मित्र मतभेदांमुळे काहीवेळा एकमेकांपासून वेगळे होतात. पण तुम्हाला माहितीये का, मैत्री तुटल्यावर होणारे दुःख हे अगदी ब्रेकअपसारखे असते. मैत्रीसंदर्भात ब्रिटनच्या मँचेस्टर मेट्रोपॉलिटन यूनिव्हर्सिटीचे प्रोफेसर वॅन हूफ यांनी एक संशोधन केलं आहे. या संशोधनाच्या माध्यमातून त्यांनी मैत्री तुटल्यानंर एखाद्याची अवस्था कशी असते याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलाय. यातूनच असा निष्कर्ष समोर आला आहे की, मैत्री तुटण्याचे दुःख हे ब्रेकअप एवढेच वेदना देणारे असते. मैत्री तुटल्याच्या धसक्याने काही लोक अंथरून पकडतात तर काहींचे आयुष्यमान कमी होते, असे या अभ्यासात दिसून आले आहे.



### मैत्री तुटण्यामागची कारणं?

मैत्रीत दरी निर्माण होण्यासाठी अनेक कारणं असू शकतात. मतभेदापासून ते अगदी तिसऱ्या व्यक्तीमुळे दोन चांगल्या मित्रांमध्ये खटके उडाल्याच्या घटना आजुबाजूला तुम्हाला पाहायलाही मिळतील. मित्राच्या नाराजीला फारसे महत्त्व दिले जात नाही, हेदेखील सध्याच्या घडीला मैत्रीत दरी निर्माण होण्यामागचं मोठं कारण ठरतं आहे. कोणत्याही नात्याप्रमाणे मैत्रीतही रुसवा-फुगवा हे चित्र पाहायला मिळणं स्वाभाविक आहे. पण दोघांतील एकही ज्यावेळी समजून घेण्याच्या मनस्थितीत नसतो त्यावेळी या सुंदर नात्याला गालबोट लागते.

### मैत्री टिकवायची कशी?

नातं कोणतही असोत. ते जपणं ही कला आहे. एकमेकांची काळजी घेणं. समजूतदारपणा हा देखील नाते घट्ट करण्यासाठी गरजेचा असतो. मित्राला नाराज करू नका. एखादा मित्र मदत करतोय त्याचा गैरफायदा घेऊ नये, यासारख्या शंभर बारीक सारीक गोष्टींचा सकारात्मक विचार केला तर मैत्री टिकवणं सहज सोपे आहे.

## शॉर्ट न्यूज

### तेहतीस वर्षानंतर विद्यार्थी पुन्हा एकत्रित

**चितळी :** न्यू इंग्लिश स्कूल शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा मोठ्या थाटात पार पडला. ३३ वर्षानंतर विद्यार्थी सहकुटुंब एकत्र आले होते. १९९०-९१ मध्ये दहावीच्या वर्गात शिक्षण घेणारे व मोठे व्यावसायिक असलेले १०० माजी विद्यार्थ्यांनी चितळी (ता. राहाता) शाळेत मेळावा आयोजित केला. पन्नाशी पार करत या विद्यार्थ्यांनी ३३ वर्षानंतर एक दिवस पुन्हा सहकुटुंब शाळेत येऊन आनंद मिळविला. रमेश झावरे यांच्या अध्यक्षतेखाली ही शाळा पुन्हा भरवली.

### तरुणांनी वेळेला महत्व द्यावे: वाघचौरे

**संगमनेर :** ध्येयासाठी प्रामाणिकपणा, जिद्द, चिकाटी असेल तर यश मिळवण्यापासून तरुणांना कोणीही रोखू शकत नाही. त्यासाठी तरुणांनी वेळेले महत्व द्यावे, असे आवाहन संगमनेर विभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सोमनाथ वाघचौरे यांनी केले. संगमनेर तालुक्यातील रायते येथील किशोर भाऊसाहेब पानसरे यांची पोलिस उपनिरीक्षकपदी नुकतीच नियुक्ती झाल्याने या सुपुत्राचा सत्कार मंगळवारी करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात वाघचौरे बोलत होते. प्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### मुळाच्या गाळप हंगामाची सांगता

**सोनई :** मुळा सहकारी साखर कारखान्याच्या ४६ व्या गळीत हंगामाचा सांगता कार्यक्रम नुकताच झाला. कारखान्याचे संचालक दामोधर टेमक व लक्ष्मण पांढरे यांनी सपत्नीक गव्हाण व उसाच्या मोळीची विधिवत पूजा केली.कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तुवर, उपाध्यक्ष कडुपाटील कर्डीले यांच्याहस्ते गव्हाणीत उसाची शेवटची मोळी टाकून गळीत हंगामाची सांगता करण्यात आली. याप्रसंगी गळीत हंगामात सर्वाधिक ऊस तोडणी व वाहतूक करणाऱ्या हार्वेस्टर, ट्रक, ट्रॅक्टर व बैलगाडी मालकांचा कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तुवर यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला.

### अंबिका विद्यालयाचे एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**पारनेर :** तालुक्यातील देवीभोयरे येथील अंबिका विद्यालयात एनएमएमएस परीक्षेत बसलेल्या २३ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून एक विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाला आसुन १२ विद्यार्थी सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य राजेंद्र वाघ, सहशिक्षक मच्छिंद्र परंडवाल, सुदाम म्हस्के, संजय जाधव, गितांजली शिंदे, बोरुडे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष शिवाजी जाधव यांनी अभिनंदन केले.

### नगरपालिका शाळेत मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू

**श्रीरामपूर :** गोंधवणीतील महादेव मंदिराजवळील नगरपालिका शाळा क्रमांक ३ येथे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी मोफत प्रवेश प्रकिया सुरु झाली आहे. दर्जे दार गुणवत्तापूर्ण शिक्षण, ई-लर्निंग अध्यापन, व्यक्तिमत्व विकासासह विविध योजनांचा यात समावेश असणार आहे. नगरपालिका शाळांमध्ये नुकतीच पवित्र पोर्टलमार्फत नवीन शिक्षकांची नियुक्ती झाली आहे. अनुभवी शिक्षकांसोबतच नवनियुक्त गुणवत्ताधारक शिक्षक उपलब्ध झाल्याने विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर अधिकाधिक भर राहणार आहे.

# उन्हामुळे विद्यार्थ्यांना शाळा बंधनकारक करू नका

## राज्य सरकारचे शिक्षण संचालकांना आदेश



**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**राज्यभरात गेल्या काही दिवसांपासून तपमानात प्रचंड वाढ होते आहे. शुक्रवारी तर ४२ अंशापेक्षा अधिक तपमान नोंदले गेले होते. विद्यार्थ्यांचा उष्माघातापासून बचाव करण्यासाठी राज्य सरकारने शिक्षण विभागाला शुक्रवारी (१९ एप्रिल) दिशानिर्देश दिले आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना शाळेत येणे बंधनकारक करता येणार नाही. त्यांना गैरहजर राहण्याची सवलत देण्यात यावी. अशा स्पष्ट सूचना शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी शिक्षण संचालकांना दिल्या आहेत.**

राज्यभरात उन्हाची तीव्रता वाढली आहे. अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई आहे. तर अद्याप शाळांना उन्हाळी सुट्या लागलेल्या नाहीत. या सुट्या २ मे पासून लागणार आहेत. तर १५ जून पासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. सुट्या लागण्यापूर्वी अनेक शाळांमध्ये नववी-दहावीसाठी फाऊंडेशन वर्ग घेतले जात आहेत. तसेच शाळापूर्व तयारीची सुरुवात करण्यात आली आहे. पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहिर होणे बाकी असल्याने अधिकचे तास अजूनही शाळांमध्ये सुरु आहेत.

काही दिवसांपासून होत असलेला उन्हाचा त्रास यामुळे उष्णतेची लाट पसरली आहे. तेंव्हा सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यापासून सवलत देण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. २२ एप्रिल पासून सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याबाबत सवलत देण्यात येत असून, राज्यातील इतर मंडळांच्या शाळा वेळापत्रकानुसार सुरु असल्यास अथवा अशा शाळांमध्ये महत्त्वाचे शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असल्यास विद्यार्थ्यांना उपस्थित राहणेपासून सवलत देण्याबाबत शाळा प्रशासनाने त्यांच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा असे महाजन यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे.

# नगर लोकसभेसाठी शक्ती सिंग यांची निवडणूक निरीक्षकपदी नियुक्ती

**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगांने केंद्रीय निवडणूक आयोगाने नगर लोकसभा मतदार संघासाठी शक्ती सिंग यांची निवडणूक निरीक्षक (खर्च) म्हणून नियुक्ती केली आहे.**



निवडणूक निरिक्षक (खर्च) शक्ती सिंग यांच्याशी ८५२७६६८५८३ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. निवडणूक कालावधीत निवडणूक निरीक्षक सिंग यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह येथे असणार आहे. निवडणुक निरीक्षक यांचे संपर्क अधिकारी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कुंदन दंडगव्हाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे, अशी माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.







# हिरवाईने नटलेल्या हिवरे बाजारचे नाव हिरवे बाजार करावेसे वाटते !

## समाधान महाराज शर्मा यांचे गौरोद्गार



**हिवरे बाजार : प्रतिनिधी**

**माणसाने आपल्याला जाताना जी सहा मन वजनाची लाकडे लागतात इतकी तरी झाडे लावावीत. तोंड देखले वृक्षारोपण न करता संगोपन देखील महत्त्वाचे आहे. त्यामुळेच आदर्श गाव हिवरे बाजार हे चहूबाजूने वाईने नटलेले गाव आहे. त्यामुळे बाजारचे नाव मला हिरवे बाजार करावेसे वाटते असे गौरवोदगार हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी काढले.**

नगर तालुक्यातील हिवरे बाजार येथे अयोध्येतील श्री राम लल्ला मूर्ती शीलांश स्थापनेनिमित्त आयोजित श्री राम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्यात दुसरे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक, महात्मा फुले राहुरी कृषी विद्यापीठातील निवृत्त शास्त्रज्ञ नानासाहेब जाधव, नगर शहर संघचालक डॉ.रवींद्र साताळकर, दैनिक लोकमतचे नगर निवासी संपादक सुधीर लंके, विकास अधिकारी शाम भोकरेआदी मान्यवर उपस्थित होते. समाधान महाराज शर्मा यांनी श्री राम जन्म सोहळा हे कथेचे दुसरे पुष्प गुंफले.

कथा निरूपणात ते पुढे म्हणाले की आज रामनवमी आहे राम जन्माच्या दिवशी हिवरे बाजारात शीलांश स्थापनेनिमित्त आयोजित कथे मध्ये श्री राम जन्म होतो यापेक्षा दुसरे भाग्य ते काय. ज्याला स्वत:चं ग्राम राज्य वाटतं असाच होता तो राम म्हणून त्याला रामराज्य म्हणतात. हिवरे बाजारातली हिरवाई पाहून समाधान वाटते. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे असं राज्य ज्या वेळेला होत ना त्या वेळेलाच म्हणायचं ग्राम राज्यात रामराज्य. जे माझे आहे ते जपले पाहिजे. तुम्हाला लागणारी लागणारी कमीत कमी किती तरी झाडे लावा त्याला जगवा त्याला मोठ करा. वृक्षारोपण मजा म्हणून करायचं नाही, साहेब आले होते आणि तीन खड्डे खोदले. संगोपन फार महत्त्वाचे आहे स्वत:च्या बाळाला जसे वाढवतो तसे वृक्षाला वाढवले पाहिजे. हिवरे बाजारमध्ये ते झाले त्यामुळे येथे ग्राम राज्यात रामराज्य ही संकल्पना रुजली हे प्रशसनीय आहे.

कथेच्या दुसऱ्या दिवशी कथा ऐकण्यासाठी येणाऱ्या महिला वर्गाला पिवळा रंग देण्यात आला होता समस्त महिला वर्गाने पिवळ्या रंगाच्या साड्या परिधान केलेल्या होत्या कथेच्या तिसऱ्या दिवशी गुरुवारी लाल रंग वेश परिधान करण्यासाठी देण्यात आला आहे. दुसऱ्या पुष्पाची सांगता महाआरतीने करण्यात आले. गावातल्या शंभर यजमानाने सपत्नीक महाआरतीमध्ये सहभाग घेतला त्यानंतर महाप्रसाद वाटण्यात आला.

# जिल्ह्यात टंचाई निवारणार्थ नियंत्रण कक्ष टँकरच्या संख्येत झपाट्याने वाढ

**नगर : प्रतिनिधी**

**मागील वर्षी जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे. याशिवाय जिल्ह्यात भूजल पातळीचा स्तर खालवल्याने पाणी टंचाई, चारा टंचाई निर्माण झाली आहे. याच अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाई नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांनी दिली.**



जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने टँकरच्या संख्येत झपाट्याने वाढ होत आहे. आजमितीला टँकरची संख्या २०० च्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. त्याचप्रमाणे जनावऱ्यांच्या चाऱ्याचाही प्रश्न निर्माण झाला आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्ह्यात टंचाई निवारणासाठी नियंत्रण कक्ष स्थापन झाला असून, नागरिकांनी समस्या असल्यास १०७७ या क्रमांकावर नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



# कुकडी नदी कोरडी ठाक, शेतकरी अडचणीत

## आवर्तनादरम्यान नदीत पाणी न सोडल्याने नाराजी



गाडीलगांव जवळील कुकडी नदीपात्र

गाडीलगांव : प्रतिनिधी

**कुकडी डाव्या कालव्यातून सोडण्यात येणाऱ्या आवर्तनावेळी कुकडी नदीपात्रात पाणी न सोल्याने कुकडी नदीचे पात्र कोरडे ठाक पडले असून शेतामधील उभ्या पिकाला पाणी नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. दरम्यान, आवर्तनावेळी पाणी न सोडल्याने शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.**

निसर्गाचा समतोल ढासळल्याने तापमानात मोठया प्रमाणावर वाढ झाली असून उन्हा तान्हामध्ये बळीराजाला शेतामध्ये राबावे लागत आहे. कधी अवकाळी पाउस तर कधी होणा-या गारपीटीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. कडाक्याच्या उन्हामध्ये पिण्यासाठी, वापरासाठी, जनावरांसाठी तसेच शेतीसाठी पाण्याची अत्यंत आवष्यकता असून जलसंपदा विभागाच्या आठमुठया धोरणामुळे या परीसरात पाण्याची तिव्र पाणी टंचाई निर्माण झाली आहे.

गेल्या आठ दिवसांपासून कोरडे पडले आहे. पंधरा दिवसांपूर्वी कुकडी डाव्या कालव्याचे आवर्तन सोडण्यात आल्यानंतर आवर्तन बंद होताना पाणी सोडणे अपेक्षीत होते. मात्र ते सोडले गेले नाही. त्यामुळे शेतामध्ये उभे असलेले चारा पिके पाण्यावाचून जळू लागले असून शेतकरी मोठया संकटात सापडला आहे. शेतमालास भाव नसल्याने शेतकरी जोड धंदा म्हणून दुधाचा व्यवसाय करीत आहेत. अगोदच दुधाचे भाव कमी झालेले असताना पशुखाद्याच्या किमती गगणाला भिडल्या आहेत. चारा पिके जळू लागल्याने महागाडे पशुखाद्य खरेदी करणे शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेर आहे.

सध्या लोकसभा निवडणूकीची धामधूम सुरू असल्याने गाव पुढारी, सरपंच, आमदार, खासदारांकडे पाण्याच्या प्रश्नाकडे लक्ष देण्यास वेळ नाही. शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून या प्रश्नात लक्ष घालण्याची मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येते आहे.

# कान्हूर पठारच्या ३२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड

## जनता विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश

कान्हुर पठार : प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन एम एम एस ) परीक्षेमध्धेपारनेर तालुक्यातील कान्हूर पठार येथील जनता विद्या मंदिर विद्यालयाचे ५१ पात्र विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली असून त्यापैकी ३ विद्यार्थी केंद्र सरकार शिष्यवृत्तीसाठी तर २८ विद्यार्थी राज्य सरकार सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत.**

तन्वी शेळके,तनिष्का भागवत, स्वरांजली फापाळे हे विद्यार्थी केंद्रसरकार शिष्यवृत्तीसाठी तर ईश्वरी झावरे,प्रथमेश ठुबे,आयुष ठुबे, तन्वी शिंदे,मिताली भागवत,ऐश्वर्या साके,सोहम गवळी,सार्थक झावरे,राज ठुबे,सोहम वाळुंज,अनुष्का देशमुख,ईश्वरी नवले,अपेक्षा ठुबे,अनुष्का ताठे,समीर कोठुळे, यश ठुबे,सोहम फापाळे,रोहित पागिरे,रुपाली भागवत,शुभांगी ठुबे,हर्षवर्धन मातेरे,प्रिती भालेकर,सार्थक परांडे,संस्कृती ठुबे,आदित्य निमसे,प्रथमेश नवले,स्नेहल लंके,ओंकार ठुबे,शिवम गुंड, हे २९ विद्यार्थी राज्य सरकार सारथी शिष्यवृत्तीसाठी अशा एकूण ३२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.



केंद्र सरकार शिष्यवृत्तीसाठी पात्र ३ विद्यार्थ्यांना दरवर्षी इयत्ता ९ वी ते १२ वी असे ४ वर्षापर्यंत प्रति विद्यार्थी ४८ हजार हजार रुपयाप्रमाणे एक लक्ष चव्वेचाळीस हजार रुपये एवढी रक्कम प्राप्त होणार आहे

तसेच सारथी शिष्यवृतीधारक २९ विद्यार्थ्यांना इयत्ता ९ वी ते १२ वी असे ४ वर्षापर्यंत प्रति विद्यार्थी अकरा लक्ष तेरा हजार सहाशे रुपये प्राप्त होणार असून विद्यालयातील एकूण ३२ विद्यार्थ्यांना बारा लक्ष सत्तावन्न हजार सहाशे रुपये प्राप्त होणार आहेत.

या विद्यार्थ्यांना एन एम एम एस शिष्यवृत्ती विभागप्रमुख ओमप्रकाश देंडगे, वैशाली सुंबे,विनायक शेळके,मच्छिंद्र नागरगोजे,गोकुळ भागवत,महेशकुमार साबळे,अश्विनी थोरात आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण रोहोकले,स्थानिक स्कुल कमिटीचे सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ,सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रामपंचायत सदस्य कान्हूरपठार, विविध पतसंस्थांचे पदाधिकारी व सदस्य, पंचक्रोशीतील थोर देणगीदार व शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

# दादाजी सांप्रदाय पायी दिंडी सोहळयाचे प्रस्थान

## १० मे रोजी मध्यप्रदेशातील खंडव्यात पोहचणार



पळवे खुर्द : प्रतिनिधी

**श्री क्षेत्र दादाजी धाम पुणे ते श्री श्रेत्र दादाजी धाम खंडवा, मध्यप्रदेश अशा पायी दिंडी सोहळयाचे १७ एप्रिल रोजी पुण्यातील खराडी बायपास येथील अहिल्यादेवी होळकर महिला उद्योग हॉल येथून मोठया उत्साहात प्रस्थान झाले. १० मे रोजी हा पायी दिंडी सोहळा खंडवा, मध्यप्रदेश येथे पोहचणार आहे.**

आद्य शंकराचार्य व ज्योतिर्मठचे प्रथम शंकराचार्य श्री त्रोटकाचार्य यांच्या गुरू परंपरेतील हा अध्यात्मिक दादाजी सांप्रदाय आहे. दादाजी सांप्रदायातील संत श्री कमलभारती आणि गौरीशंकर महाराज यांनी नर्मदा मैय्या परिक्रमेची परंपरा आजीवन जोपासली. श्री गौरीशंकर महाराजांनी नर्मदा नदीमध्ये घोर तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येवर प्रसन्न होऊन आद्यशिवाने श्री धुनिवाले दादाजी या नावाने अवतार धारण करून त्यांचया तापोसामर्थ्याने अनेक अलौकिक लिला, चमत्कार केले. त्यानंतर श्री हरिहरजी भोले भगवान, रेवानंद सरकार, भक्तानंदजी महाराज, सिध्दानंदजी महाराज व त्यानंतर पिंपळनेर, साक्री, धुळे येथील शिवानंदजी महाराज हे परमसदगुरू रूपात भक्तांना प्राप्त झाले.

शिवानंदजी महाराज यांनी दादाजी सांप्रदायाविषयी तसेच आत्मकल्याणाचे सखोल ज्ञान भक्तांना दिले, आजही देत आहेत. शिवानंदजी महाराज भक्तांसमावेत दादा नामाचा प्रचार, प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात, भारतभर आणि पाश्चिमात्य देशांमध्ये करत आहेत. दादाजी सांप्रदायाचे गुढ रहस्य व दादाजी भक्तांचे आराध्य दैवत महान १००८ धुनिवाले दादाजी यांच्या नामाची महती अवघ्या विश्वामध्ये पोहचविण्याचे काम शिवानंद महाराज करीत आहेत. मानवी जिवात्म्यांचे भौतिक त्या बरोबर अध्यात्मिक कल्याण व्हावे हाच यामागील हेतू असल्याचे दादाजी महाराजांच्या भक्तांकडून सांगण्यात आले.

# किसनराव वराळ पाटील यांचे मोठे योगदान

## ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील जनतेसाठी सहकारमहर्षी किसनराव वराळ पाटील यांचे योगदान मोठे असून संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील हे किसनभाऊ यांच्याच कामाचे अनुकरण करीत असल्याने त्यांना निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात मोठा जनाधार असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त तथा ज्येष्ठ नेते सिताराम खिलारी सर यांनी व्यक्त केले आहे.**

खिलारी सर यांनी संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशन कार्यालयाला सदिच्छा भेट दिली यावेळी ते बोलत होते. उपसरपंच माऊली वरखडे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी अशोकराव लंके, अस्लमभाई इनामदार, अविनाश निचीत, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी संदीप वरखडे, दुतारे मामा, श्रीकांत पवार आदी उपस्थित होते.



खिलारी सर यावेळी म्हणाले गेली पन्नास वर्षात वराळ कुटुंबाने सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रासाठी फार मोठे योगदान दिले आहे. कै. किसनभाऊ वराळ पाटील या निघोज गावाला सामाजीकतेचा आदर्श घालून दिला आहे. माजी पंचायत समिती सदस्य मच्छिंद्र वराळ पाटील यांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत. माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती संदीप वराळ पाटील यांनी आठ ते नउ वर्षाच्या कार्यकाळात तालुक्यातील युवकांना संघटीत करीत तालुक्यातील जनतेच्या संपर्कात राहून समाजकारणाचा संदेश दिला आहे. संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील यांनी गेली सात वर्षात काम करताना कुटुंबाचे कार्य जोमाने सुरू ठेवीत निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली आहेत.

राज्याचे महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ सुजय विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनखाली काम करताना सचिन वराळ पाटील यांनी जिल्हा परिषद गटात सर्वाधिक कामे केली असून ग्रामपंचायत माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकासकामे झाली असून निघोजचा विकासाभिमुख चेहरा बदलला असल्याने सचिन वराळ पाटील एक प्रबळ नेतृत्व असल्याचे गौरवोद्गार त्यांनी व्यक्त केले आहे.

# आर्शाद शेख राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र

## पिंपरी जलसेन विद्यालयाचे एनएमएमएस परिक्षेत यश

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील संजीवनी शिक्षण संस्थेच्या पिंप्री जलसेन येथील ग्रामीण बहु उद्देशिय माध्यमिक विद्यालयातील कु. आर्शाद समीर शेख (१३२ गुण) मिळून एन.एम.एम. एस. शिष्यवृत्ती परीक्षेत राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी पात्र झाला आहे. तसेच ७ विद्यार्थी सारथी या शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. विद्यालयाचे एकूण २० विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते पैकी १० विद्यार्थी पात्र झाले आहे.**

पिंप्री जलसेन विद्यालयात वर्षभर विविध स्पर्धा परीक्षा आयोजित केल्या जातात यामध्ये स्कॉलरशिप,एनएमएमएस, मंथन, नवोदय, शासकिय चित्रकला परीक्षा या सारख्या शासकिय परीक्षांचा सामावेश असतो. शाळेमध्ये पुढील स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने विदयालयातच विविध मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन घेतले जाते .




एनएमएमएस या परीक्षेसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती १२५०० रु व सारथी साठी ९६०० रू येवढी प्रतिवर्षी या प्रमाणे १२ वी पर्यंत ही रक्कम विद्यार्थ्यांना मिळत असते.

या सर्व विद्यार्थ्यांना विलास सपकाळ सर, दादाभाऊ बोरुडे सर,चंद्रशेखर ठुबे सर, लैला शेख मॅडम पठारे विजय सर यांचे मार्गदर्शन लाभले.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संजीवनी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती गितांजलीताई शेळके, उपाध्यक्ष सचिव व सर्व सदस्य यांनी अभिनंदन केले तसेच सरपंच उपसरपंच व सर्व सदस्य समस्थ ग्रामस्थ पिंप्री जलसेन यांनीही सर्व विद्यार्थी व शिक्षक यांचे अभिनंदन केले.

# सुपा पोलिस स्टेशन हद्दीतील ६७ परवानाधारकांची शस्त्र जमा

## लोकसभा निवडणूकीसाठी खबरदारीचा उपाय



सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सुपा पोलीस स्टेशन हद्दीतील ७४ परवानाधारक शस्त्रांपैकी ६७ परवानाधारकांनी आपली शस्त्र तात्पुरती जमा केली आहेत.**

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्व शस्त्रे परवाना धारकांनी आपली शस्त्रे जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अरूण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलिस स्टेशन हद्दीतील ७४ परवाना धारकांना याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. यामध्ये बँक, पेट्रोलपंप सह इतर ठिकाणी शस्त्रांसह सुरक्षा रक्षक आहेत त्यांना यातुन सुट देण्यात आली आहे. नियमित सुरक्षारक्षक वगळता ६७ परवानाधारकांनी आपली शस्त्रे सुपा पोलिस स्टेशनला जमा केली आहेत.

या ६७ शस्त्रांमध्ये पिस्तूल दोन, रिव्हॉल्वर, अकरा व इतर ५४ शस्त्रे आहेत. यामध्ये एक नळी, दोन नळी या बंदुकांचा समावेश आहे अशी माहिती खैरे यांनी दिली. लोकसभा निवडणूका संपल्यानंतर ही शस्त्रे संबंधितांना परत दिली जाणार आहेत. सार्वजनिक निवडणुकांमध्ये कायदा सुव्यवस्था राखली जावी कुठे काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून ही शस्त्रे जमा करण्यात आली आहेत.

# मातृ-पितृ पूजन सोहळा प्रेरणादायी !

## डॉ.विकासानंद महाराज मिसाळ यांचे गौरोद्गार




सुपा : प्रतिनिधी

**संस्कृतीच्या पुनर्जीवनासाठी समाजात मातृ-पितृ पूजन त्याचे अभिष्टचिंतनासारखे कार्यक्रम प्रेरणादायी ठरतात असे प्रतिपादन गुरुवर्य कृष्णकृपांकित हभप डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांनी केले.**

वडनेर हवेली येथे हभप विष्णुपंत सोनुळे व हभप बाळकृष्ण महाराज सोनुळे यांनी आपले वडील सेवानिवृत्त आदर्श शिक्षक हभप साहेबराव सोनुळे व आई सुमन सोनुळे यांचा मातृ पितृ पूजनाचा सोहळा आयोजित केला होता. याप्रसंगी कृष्णकृपांकित ह भ प डॉ.विकासनंद महाराज मिसाळ यांनी किर्तन रुपी सेवा दिली.

यावेळी मिसाळ महाराज यांनी निळोबारायांच्या अभंगातून आपली संस्कृती कुटुंबातील एकोपा जीवनाचे सार्थकता

**हभप बाळकृष्ण महाराज सोनुळे हे आपल्या कार्यातून वारकरी संप्रदायाला पुढे घेऊन जात असताना प्रवचन कीर्तनारुपी सेवा करत असतात व तोच वारकरी संप्रदायाचा वारसा जपून त्यांनी आपल्या मातृ पितृ यांचे पूजन सोहळा करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.**

याविषयी हभप साहेबराव सोनुळे गुरुजी यांच्या जीवन कार्याचा आदर्श असून गौरव प्राप्त करून देणारा असल्याचे यावेळी विशद करण्यात आले. समाजात आई-वडिलांचे पूजन करण्याची प्रथा परंपरा पुन्हा एकदा रोड होण्यासाठी हभप बाळकृष्ण महाराज यांनी ठेवलेला मातृ-पितृ पूजन सोहळा हा इतरांसाठी आदर्श निर्माण करणारा असणार आहे.

यावेळी वडनेर हवेली पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी उत्साहात सहभागी होऊन सोनुळे दापत्याला शुभेच्छा देत माता-पित्यांचा आदर्श कायम ठेवण्याचा संकल्प केला.

# विद्यार्थ्यांप्रती जिल्हा परिषद शाळेबाबत आपुलकी

## ■ सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ■ भोयरे गांगर्डात शाळा पुर्व तयारी मेळावा

सुपा : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेबाबत माजी विद्यार्थ्यांना नेहमीच आदर राहीला आहे, आपण ज्या शाळेत लहानाचे मोठे झालो त्या शाळेप्रती विद्यार्थ्यांचे मोठे योगदान लाभले असून आजही शिक्षकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनात मान सन्मान पहावयास मिळतो ही मोठी कौतुकास्पद बाब असल्याचे प्रतिपादन मुख्याध्यापिका रंजना दरेकर - गुंड यांनी केले.**

भोयरे गांगर्डा ता. पारनेर येथील इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युवराज डोंगरे हे होते.

यावेळी शाळेत शाळा पूर्व तयारी मेळावा आयोजित करण्यात आला होता. इयत्ता पहिलीतील दखलपात्र मुले व त्यांचे सर्व पालक उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांचे फुले देऊन स्वागत करण्यात आले. श्रीम.



खेडकर मॅडम यांनी सर्वांचे स्वागत केले. श्रीम.भुजबळ मॅडम यांनी मेळावा आयोजनाबाबत पालकांना माहिती सांगितली. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीम. दरेकर मॅडम यांनी पालकांना जिल्हा परिषदेच्या शाळेत मुलांना प्रवेश घेण्याविषयी आवाहन केले. त्याचबरोबर मंथन परिक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या रोहन दौलत गांगड इयत्ता तिसरी व श्रावणी सागर रसाळ इयत्ता पाचवी या दोघांचा शाळेच्या वतीने ग्रामस्थांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमास सरपंच सौ.पुजा केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, शा.व्य. अध्यक्ष युवराज डोंगरे, मधूकर लगड, युवराज रसाळ, गणेश रसाळ, संजय पवार, शेखर रसाळ, संजय तरटे, प्रशांत पवार, माणिक पवार, जागृती साबळे, उज्वला गांगड, मोहिनी गांगड, हेमलता केकडे आदी मान्यवर उपस्थित होते. शिक्षणप्रेमी माणिक पवार यांनी पालकांना सांगितले की, शिक्षणाबरोबरच पालकांनीही मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष द्यावे. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकलेल्या मुलांचा सर्वांगीण विकास होतो. यादव सर यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले. यादरम्यान शाळेतील विद्यार्थी व पालक यांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com